# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad
## Date – 20 May 2022
## Time 7.10 AM to 7.25 AM
## Language Marathi
## आकाशवाणी औरंगाबाद
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक २० मे २०२२ सकाळी ७.१० मि.

****

## ठळक बातम्या

- शेतीला आधुनिकतेची जोड द्यावी-खरीप हंगाम २०२२ आढावा बैठकीत मुख्यमंत्र्यांची सूचना
- ओबीसी आरक्षणाबाबत बाठिया समितीच्या अहवालानंतर राज्य सरकार न्यायालयात बाजू मांडणार- उपमुख्यमंत्री अजित पवार
- माजी खासदार क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिध्दू यांना एक वर्ष कारावासाची शिक्षा
- राज्यात काल कोविड संसर्ग झालेले ३१६ नवे रुग्ण
- पुणे जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटनांत ९ जणांचा धरणांमध्ये बुडून मृत्यू
- मराठवाड्यात गेल्या वर्षभरात नऊ हजार ग्राहकांकडून १३ कोटी रूपयांची वीज चोरी
- सोलापूर- तुळजापूर - उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी राज्याचा वाटा देण्याबाबत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचं राज्य सरकारला पत्र

आणि

- बाराव्या जागतिक महिला मुष्टीयोद्धा अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या निखत झरीन हिला सुवर्ण पदक

****

## सविस्तर बातम्या

शेतीला आधुनिकतेची जोड द्यावी, रोग, किडीचा प्रादुर्भाव रोखण्याबरोबर, अतिवृष्टीचा सामना करण्यासाठी यंत्रणेनं सतर्क रहावं, अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. राज्याच्या खरीप हंगाम २०२२ आढावा बैठकीत ते काल बोलत होते. आरोग्यासाठी पोषक गुणधर्म असणारी बियाणं शेतकरी बांधवाना मोफत देणारं, त्यांच्या आरोग्याचा विचार करणारं महाराष्ट्र, हे देशातलं पहिलं राज्य असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. विकेल ते पिकेल अभियान यशस्वी करण्यासाठी शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करावं, आदी सूचना, मुख्यमंत्र्यांनी यावेळी केल्या. यंदा चांगल्या पावसाची अपेक्षा असून, कृषी विभागानं उत्तम नियोजन केलं आहे, त्यामुळे यंदाचा खरीप हंगाम यशस्वी होईल, असा विश्वास, मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

यंदाच्या खरीप हंगामासाठी सुमारे १८ लाख क्विंटल बियाणं आवश्यक असून, महाबीज, राष्ट्रीय बियाणे महामंडळ आणि खासगी संस्थेकडे मिळून, १९ पूर्णांक ८८ लाख क्विंटल बियाणं अपेक्षित आहे, अशी माहिती कृषीमंत्री दादा भुसे यांनी या बैठकीत दिली.

दरम्यान, राज्यात पाच जूनला तळ कोकणात मोसमी पाऊस दाखल होईल असा अंदाज, भारतीय हवामान विभागाचे कृष्णानंद होसाळीकर यांनी या बैठकीत वर्तवला. मराठवाड्यात यंदा सामान्यपेक्षा जास्त पाऊस होईल, तसंच एकूणच महाराष्ट्रात समाधानकारक पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं, होसाळीकर यांनी यावेळी सांगितलं.

****

इतर मागास प्रवर्ग – ओबीसी आरक्षणासंदर्भात बाठिया समितीचा अहवाल आला की मध्य प्रदेश सरकार जसं सर्वोच्च न्यायालयात गेलं, तसं राज्य सरकारही जूनमध्ये बाठिया समितीचा अहवाल आल्यानंतर, आपलं म्हणणं न्यायालयात मांडेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मध्य प्रदेशच्या धरतीवर महाराष्ट्रातही ५० टक्क्यांच्या पुढे जागा न जाऊ देता ओबीसींना प्रतिनिधित्व मिळावं, असा सरकारचा प्रयत्न राहील, त्यानुसार कामाला सुरुवात केली असल्याचं ते म्हणाले.

****

कला संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या एलिमेन्टरी परीक्षेचा निकाल २३ मे रोजी, तर इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल आज २० मे रोजी जाहीर होणार आहे. डब्ल्यू डब्ल्यू डब्ल्यू डॉट डी ओ ए डॉट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इन या संकेतस्थळावर हा निकाल जाहीर केला जाणार असल्याचं, संचालनालयानं सांगितलं आहे.

****

आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने इतर पक्षासोबत युती आघाडी करण्यासंदर्भात जिल्हाध्यक्ष तसंच त्या जिल्ह्याचे प्रभारी यांनी स्थानिक पातळीवर संबंधित पक्षाशी चर्चा करून राज्य कार्यकारणी समोर प्रस्ताव ठेवावा असा निर्णय राज्य कार्यकारिणीत घेण्यात आला आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली काल औरंगाबाद इथं वंचित बहुजन आघाडीच्या राज्य कार्यकारिणी बैठक झाली. पक्ष यापुढे राज्यात नव्या जोमाने सर्व निवडणुकांना सामोरे जाणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी यावेळी सांगितलं.

****

कान्स चित्रपट महोत्सवात सहभागी होण्यासाठी सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्राचं शिष्टमंडळ रवाना झालं आहे. या शिष्टमंडळात या महोत्सवासाठी निवड करण्यात आलेल्या ‘कारखानीसांची वारी’ , ‘पोटरा’ आणि ‘तिचं शहर होणं’ या मराठी चित्रपटांचे निर्माते, दिग्दर्शक यांचा समावेश आहे.

****

वाराणसी इथल्या ज्ञानवापी मशिदीच्या सर्वेक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयात आज दुपारी तीन वाजता सुनावणी निश्चित केली आहे. यावेळी सर्व पक्षांना अहवाल सादर करण्यास सांगण्यात आलं आहे. यासोबतच वाराणसी न्यायालयातल्या सुनावणीलाही सर्वोच्च न्यायालयानं स्थगिती दिली आहे.

तत्पूर्वी ज्ञानवापी मशिदीच्या सर्वेक्षणाचा अहवाल वाराणसी न्यायालयात सादर करण्यात आला. या अहवालात संबंधित परिसराचे दीड हजार छायाचित्रं आणि ३२ जी बी मेमरी क्षमतेची आठ मेमरी कार्ड असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

दरम्यान, मथुरा इथल्या श्रीकृष्ण जन्म स्थळाच्या बाजुला असलेल्या शाही ईदगाह जमिनीच्या मालकी हक्काची मागणी करणारी श्रीकृष्ण जन्मभूमीन्यास आणि अन्य खाजगी पक्षांची याचिका जिल्हा आणि सत्र न्यायालयानं काल स्वीकारली आहे.

****

माजी खासदार क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिध्दू यांना ३४ वर्षांपूर्वीच्या मारहाण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली आहे. २७ डिसेंबर १९८८ रोजी पतियाळा इथं गुरनाम सिंग या ६५ वर्षीय वृध्दासोबत झालेल्या हाणामारीत गुरनाम यांचा मृत्यू झाला होता.

****

राज्यात काल कोविड संसर्ग झालेले ३१६ नवे रुग्ण आढळले. त्यामुळे राज्यभरातल्या कोविड बाधितांची एकूण संख्या ७८ लाख ८१ हजार ८५८ झाली आहे. काल या संसर्गाने कोणाचाही मृत्यू झाला नाही. राज्यभरात या संसर्गानं दगावलेल्या रुग्णांची एकूण संख्या एक लाख ४७ हजार ८५५ झाली असून, मृत्यूदर एक पूर्णांक ८७ शतांश टक्के आहे. काल २०१ रुग्ण कोविडमुक्त झाले, राज्यात आतापर्यंत ७७ लाख ३२ हजार २८२ रुग्ण या संसर्गातून मुक्त झाले असून, कोविड मुक्तीचा दर ९८ पूर्णांक ११ शतांश टक्के झाला आहे. राज्यात सध्या एक हजार ७२० रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात काल एक रुग्ण आढळल्याची नोंद झाली आहे.

****

पुणे जिल्ह्यात काल दोन वेगवेगळ्या घटनांत नऊ जणांचा धरणात बुडून मृत्यू झाला. भोर तालुक्यातील भाटघर धरणात पाच महिला तर खेड तालुक्यातील चासकमान या धरणांमध्ये चार विद्यार्थी बुडून मरण पावल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

मराठवाड्यातल्या आठ जिल्ह्यांमध्ये गेल्या वर्षभरात नऊ हजार ग्राहकांकडून १३ कोटी रूपयांची वीज चोरी उघड झाली आहे. त्यांच्याकडून चार कोटी ६१ लाख रूपये दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती, महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाच्या वतीनं देण्यात आली आहे. वीज चोरी पकडण्याची मोहीम यापुढेही चालू राहणार आहे. कोणीही वीज चोरी करू नये, असं आवाहन महावितरणच्या औरंगाबाद प्रादेशिक कार्यालयाचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ मंगेश गोंदावले यांनी केलं आहे.

दरम्यान, महावितरणनं विलासराव देशमुख अभय योजनेच्या माध्यमातून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित असलेल्या वीज ग्राहकांसाठी, व्याज आणि विलंब आकारात शंभर टक्के माफीची सोय करून पुनर्जोडणीची संधी उपलब्ध करून दिली आहे. सर्व पात्र ग्राहकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा, असं आवाहन मुख्य अभियंता भुजंग खंदारे यांनी केलं आहे.

****

सोलापूर – तुळजापूर – उस्मानाबाद रेल्वे मार्गासाठी राज्याचा वाटा द्यावा, अशी सूचना केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्राद्वारे केली आहे. तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी वैष्णव यांची दिल्लीत भेट घेवून सोलापूर – तुळजापूर – उस्मानाबाद हा रेल्वे मार्ग राज्याकडून निधीची तरतूद होत नसल्याने रेंगाळत असल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं, त्या अनुषंगाने रेल्वे मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे.

दरम्यान, औरंगाबाद रेल्वे स्थानकासाठी १६ डब्यांची पिटलाइन मंजूर केल्याबद्दल भाजपाच्या राष्ट्रीय सचिव विजया रहाटकर यांनी, रेल्वे मंत्री वैष्णव यांची नवी दिल्लीत भेट घेवून, त्यांचे आभार मानले.

****

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्यासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करणं आवश्यक असून, यासाठी कायद्याचा धाक असला पाहिजे आणि प्रशासन दक्ष असलं पाहिजे, असं राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगीता चव्हाण यांनी म्हटलं आहे. त्या काल हिंगोली इथं आढावा बैठकीत बोलत होत्या.

****

औरंगाबाद जिल्ह्यात खुलताबाद इथं असलेली औरंगजेबाची कबर पाच दिवसांसाठी बंद करण्यात आली आहे. भारतीय पुरातत्व सर्वेक्षणच्या औरंगाबाद विभागानं यासंदर्भात एक पत्रक जारी केलं आहे. एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन ही बंदी आणखी पाच दिवस वाढवली जाऊ शकते, असंही या पत्रात नमूद करण्यात आलं आहे.

****

तुर्कस्थानची राजधानी इस्तंबुल इथं झालेल्या बाराव्या आईबीए जागतिक महिला मुष्टीयोद्धा अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या निखत झरीन हिनं सुवर्ण पदक पटकावलं आहे. ५२ किलो वजनी गटाल निखतनं अंतिम सामन्यात थायलंडच्या जित्पोंग जुतामस हिच पराभव केला. या स्पर्धेत भारताला तीन पदकं मिळाली आहेत. ५७ किलो वजनी गटात मनीषानं आणि ६३ किलो वजनी गटात परवीन हिने कांस्य पदक मिळवलं आहे. भारताला जागतिक मुष्टीयोद्धा स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवून देणारी झरीन ही पाचवी महिला आहे.

****

महिला बचत गटांनी उत्पादनांचं ब्रँडिंग करण्यावर भर द्यावा, असं आवाहन लातूरचे महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केलं आहे. दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाअंतर्गत शहरातील ६ महिला बचत गटांना प्रत्येकी ४ लाख रुपये कर्ज वाटप गोजमगुंडे यांच्या हस्ते करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. कर्ज वाटप प्रक्रियेत लातूर महापालिकेनं विभागात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

****

इतर मागास प्रवर्ग – ओबीसींचं राजकीय आरक्षण टिकवा, अन्यथा ओबीसी नेते, मंत्री, आमदार, खासदार यांना राज्यात रस्त्यावर फिरु देणार नसल्याचा इशारा, ओबीसी व्हीजेएनटी जनमोर्चाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी दिला आहे. ते काल औरंगाबाद इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. येत्या एक जूनला औरंगाबाद शहरातल्या क्रांती चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय असा विराट मोर्चा काढण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

ओबीसी आरक्षण प्रकरणी महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणाच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या संतप्त कार्यकर्त्यांनी काल परभणी ते गंगाखेड मार्गावर नृसिंह पोखर्णी फाट्यावर रास्तारोको आंदोलन केलं. या आंदोलनामुळे या मार्गावरची वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती.

****

हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी काल जोरदार वाऱ्यासह पाऊस झाला. जालना शहरासह जिल्ह्यातल्या बदनापूर, अंबड तालुक्यात काल सायंकाळी सोसाट्याच्या वाऱ्यासह जवळपास अर्धातास जोरदार पाऊस झाला. औरंगाबाद शहर परिसरातही काल सायंकाळी तुरळक पाऊस झाला.

दरम्यान, येत्या दोन दिवसात राज्यात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून, विदर्भातही मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

****